

# पशुधन व डेअरी उद्योग विकास

मानवी संस्कृतीच्या सुरुवातीच्या काळापासून पाळीव प्राण्यांच्या संगोपनाची प्रक्रिया विकसित झाली. सर्व उपयुक्त प्राणीमात्रांमध्ये गायी व म्हशी यांना सदैव अग्रक्रम दिला गेला. या न्यायाने जास्तीत जास्त उपयुक्त गुरांचा जो मालक, त्यावरून त्याची सांपत्तिक स्थिती मोजली जात असे आणि तुलनात्मकदृष्टीने त्या गुरांची उपयुक्त दुग्धोत्पादन क्षमता उत्तम असणंही गरजेचं होते. कोणत्याही धर्मानुसार गायीला सौंदर्याचं व कलेचं मूल्य आहे. भारतीय इतिहासात अनेक आध्यात्मिक कथा आहेत ज्यामध्ये ३३ कोटी देव-देवतांचा अंतर्भाव गायीत असल्याचं विषद केले आहे. तसेच, मृत्यूची देवता यमदेव याचं वाहन रेडा आहे. याव्यतिरिक्त शिवाचं वाहन नंदीबैल आहे. भगवान शिव हे अस्तित्व व लय यांच्या देवता आहेत. प्रजोत्पादन ते पालनपोषण या प्रक्रियेत गुंतल्यामुळे मानवी संस्कृतीत गायीला निसर्ग व पृथ्वीमातेचे प्रतीक मानले जाते. प्राचीन संस्कृतीतही जनावरांची सेवा उपयोगात आणण्याचा प्रघात होता. त्या काळात त्यांनी प्रजोत्पादनाचं नेमकं शास्त्रीय तंत्रज्ञान विकसित केलेलं होतं. गुरांना चरण्यासाठी खास जमीन उपलब्ध करून दिली जात असे. दुधाचा वापर प्रत्यक्षरीत्या पिण्यासाठी किंवा वैदिक पद्धतीमध्ये तूप इ. स्वरूपात केला जात असे.

भगवान श्रीकृष्णांच्या काळात लोक दही, लोणी वृंदावनाहून मथुरेला नेत असत. परंतु, त्याकाळात दुग्धोत्पादनाचा स्तर हा गायीपेक्षा नवीन जन्मलेल्या वासरावर



अवलंबून असे. वासराला १००% दूधपुरवठा झाल्यावर मगच राहिलेलं दूध घरातील मालक घेत असे. गरज भागून उरलेल्या दुधाची इतर उत्पादनं तयार करून ती बाजारात विकली जात. कुटुंबाची दुधाची गरज भागल्यावर मगच उरलेलं दूध विकण्याचा विचार केला जाई. १९८० च्या दशकातही भारतातील उत्तरेकडील प्रांतात 'दूध विकणं म्हणजे बाळाला विकणं' असाच समज होता.

परंतु नंतर मात्र अशा प्रकारच्या विचारपद्धतीला सुरुंग लावला गेला आणि दूध उत्पादक आपल्या कुटुंबाची उपासमार करून बाजारात दूध विकू लागले. ह्यावर कळस म्हणजे वासरांनाही उपाशी ठेवून ते दूध बाजारात विकू लागले. या अयोग्य प्रवृत्तीला विरोध करण्यासाठी भगवान श्रीकृष्णांनी दहीहंडी सुरू केली. ज्यामध्ये बाजारात दूध विकलं जावू नये म्हणून भरलेला दुधाचा घडा ते फोडायचे. पांडवांच्या काळात नकूल व सहदेव हे गुरांच्या संगोपनातील तज्ज्ञ होते.

आधुनिक काळात औदयोगिकीकरण आणि स्वयंचलित तंत्राचा उदय झाल्यामुळे गतिमान जीवनाची गरज निर्माण झाली. झटपट तयार होणारे अन्न (फास्ट फुड) तसंच झटपट पैसा मिळवण्याचं तंत्र यामध्ये याची परिणती झाली. परिणामी दूधात भेसळ करण्याची प्रवृत्ती निर्माण झाली. पर्यावरणाचं चक्र विचारात घेता शाकाहारी प्राणी हे चारा, वैरण, पिकं, झाडं इ. खातात. या शाकाहारी प्राण्यांना मांसाहारी प्राणी खातात. मांसाहारी प्राण्यांच्या मृत्यूनंतर त्यांचं निर्जीव शरीर नष्ट पावतं आणि त्यांचं खतात रूपांतर होतं. वनस्पतींकडून पुन्हा त्याचं शोषण केलं जातं कारण त्या खतांवर त्यांचं पोषण होतं. अशी ही साधी व सरळ जीवनपद्धती आहे, असं आपण म्हणू शकतो.

आपण जर संस्कृतीचं निरीक्षण केलं तर असं लक्षात येईल की, त्या काळी लोक नदीकाठी वसाहत करत असत. तिथे ते चारा व धान्य मिळवण्यासाठी शेतीची लागवड करत असत. धान्य माणसांकरता व चारा, वैरण इ. गुराढोरांसाठी वापरलं

जाई, ज्यामुळे गाई-म्हशींकडून मानवासाठी दूध उपलब्ध होत असे. आपल्याला माहीत आहेच की, दुधात स्निग्ध पदार्थ, कर्बोदकं, प्रथिनं, जीवनसत्त्वं, खनिजं यांचा अंतर्भाव असल्याने ते 'पूर्णान्न' ठरतं. गुराढोरांचं शेण आणि पिकांचा अवशिष्ट भाग यांचं रूपांतर खतात होतं. शेतीसाठी हे अतिशय उपयुक्त ठरते. आताच्या काळात लोक जास्तीत जास्त नफा मिळवण्यासाठी औद्योगिक क्षेत्राकडे वळले आहेत. शेती व डेअरी उद्योग तेवढे फायद्याचे वाटत नसल्यामुळे ते त्यांची निवड करत नाहीत. १९७० साली जेव्हा मी शाळेत शिकत होतो, तेव्हा मुलांचा कल शेतकरी होण्याकडे जास्त होता. व्यापार किंवा नोकरी ह्याला तितकंसं महत्त्व नव्हते; पण आजच्या काळातील परिस्थितीत तुलनात्मकदृष्टीने मोठ्या प्रमाणात बदल झाला आहे. आता उदयोगधंदे व नोकरी हे शेतीपेक्षाही वरचढ ठरले आहेत.

शेती व दुग्धोत्पादन क्षेत्राच्या प्रत्येक विभागाकडे दुर्लक्ष झाल्याने ही परिस्थिती उद्भवली आहे. 'भारतातील दुग्धोत्पादन विकास' या विषयावरील केंद्रसरकारचा अहवाल आणि महाराष्ट्र सरकारच्या पशुधन व शेतकी विभागाने ह्याच मुद्यावर सादर केलेला अहवाल व त्यातील या विविध क्षेत्रांतील समस्यांच्या विशेष टिप्पणीसह असलेल्या निरीक्षणांमुळे वरील विधानाला पुष्टी मिळते.

कधीकधी अशी परिस्थिती किंवा प्रसंग उद्भवतो की जिथे देशामध्ये लोकांना दूध पिण्यात रुची आहे की नाही हे ठरवण्याची वेळ येते. हा मूलभूत प्रश्न निर्माण होण्याचं कारण म्हणजे, मानवप्राणी हा एकमेव सामाजिक घटक आहे की जो आयुष्यभर दुधाचं सेवन करतो. सरकारने 'चहा' हे 'राष्ट्रीय पेय' घोषित केलेलं आहे. खरंतर चहाचे मळे हे फक्त काही मोजक्याच लोकांच्या मालकीचे आहेत, सामान्य शेतकऱ्यांच्या नव्हे. याशिवाय, सरकारने दारूच्या भट्ट्या, वाईन (द्राक्षापासून बनवलेली दारू) किंवा तत्सम पेयांना मान्यता दिलेली आहे. हवा भरलेल्या फसफसणाऱ्या पेयांचा आणि निरनिराळ्या शीतपेयांचा प्रचार जाहिरात क्षेत्रातील प्रत्येक माध्यमाकडून- दृकूश्राव्य (टी.व्ही.), वर्तमानपत्रं, जाहिरात फलक वगैरेंमध्ये केला जातो. म्हणूनच सरकारने याच मार्गाने दुधाचा प्रचार करण्याचं सर्वप्रथम ठरवलं पाहिजे. राष्ट्रीय अंडी समन्वय समिती (NECC) याचप्रमाणे प्रचार करते. ती सहकारी, सरकारी किंवा खाजगी अशा कोणत्याही क्षेत्राकडून येणाऱ्या अंड्यांच्या बाबतीत प्रचार करताना- 'संडे हो या मंडे, रोज खाओ अंडे' अशी जाहिरात करते. याउलट, दुधाच्या जाहिरातीमध्ये असा संदेश पोहोचवला जातो की, जोपर्यंत दुधात काही



विशेष तत्त्वं मिसळलं जात नाही तोपर्यंत ते पौष्टिक होत नाही. अशा जाहिरातींचा काळजीपूर्वक अभ्यास केला गेला पाहिजे. आयुर्वेदात असं लिहिलं गेलं आहे की मानवाने सकाळी एक ग्लास पाणी पिणं आवश्यक आहे. दुपारच्या वेळेस एक ग्लास भरून ताक व रात्री एक ग्लास दूधाचं सेवन करणं आवश्यक आहे. परंतु, आजच्या युगात दिवसाचा आरंभ अंथरुणातच चहा (बेड टी) घेण्याने होतो. जेवण शीतपेयाबरोबर व दिवसाचा शेवट मद्यार्कयुक्त पेयाने होतो.

राष्ट्रपिता स्व. महात्मा गांधी यांनी घोषित केलं होतं की, अशा मादक पेयांवर बंदी आणावी, परंतु कराद्वारे मिळणाऱ्या पैशांच्या मोहाने सरकारने बंदी घातली नाही. अशा मद्य बनवणाऱ्या कंपन्या या बोटांवर मोजण्याइतक्या थोड्याच लोकांच्या मालकीच्या आहेत; म्हणूनच सरकारने काही कठोर निर्णय घेणं जरुरीचं आहे. ज्याची परिणती हा दृष्टिकोन बदलण्यात होईल कारण या अतिशय महत्त्वाच्या गरजा आहेत. शेतकऱ्यांच्या उद्योगधंद्यांना सरकारने नेहमी पाठिंबा द्यावा, देखरेख करावी, त्यावर नियंत्रण ठेवावं कारण ते उद्योगधंदे हे देशाचे आधारस्तंभ आहेत. सद्य:स्थितीत दुग्धोत्पादन व्यवसाय अजिबात फायदेशीर नाही; कारण पशुखाद्यांच्या किंमतीतील चढ-उतार, दूधाचा उत्पादन खर्च, दूधाचं वाटप (दुधाची विक्री यंत्रणा), दुधातील भेसळ.

कृषी व दुग्धोत्पादन क्षेत्रातील निकृष्ट प्रतीच्या सेवा तसंच तज्ज्ञ व्यक्तींकडून मार्गदर्शनातील अभाव ही देखील कारणे आहेत. विकसित देशात याबाबतीत खूप चांगली स्थिती आहे. कोणतेही सखोल नियोजन नसल्यामुळे मागणीपेक्षा जास्त कृषी व दुग्धउत्पादन ही स्थिती निर्माण होते; म्हणूनच गरज भागून शिल्लक राहिलेल्या उत्पादनाचं काय करावं ही एक समस्याच झाली आहे; कारण दूध ही नाशवंत वस्तू आहे. ती लवकर खराब होते व खूप पडेल भावात विकावी लागते. बऱ्याचदा मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याने शेतकरी ह्या क्षेत्राकडे वळत नाहीत. त्याचा दुष्परिणाम असा होतो की, मालाचा तुटवडा जाणवतो; आणि त्यामुळे दुग्धोत्पादन व कृषी उत्पन्नांच्या किमती वाढत जातात. त्यामुळे पुन्हा एकदा लोक या उद्योगांकडे वळतात.

हे एक दुष्टचक्र तयार होतं.

अशा परिस्थितीत एक गोष्ट नमूद कराविशी वाटते की, जरी शेतकऱ्यांना नफा वा तोटा सहन करावा लागला तरी दलालांना मात्र फायदाच होतो. मग ते दलाल सहकारी, खासगी अथवा सरकारी क्षेत्रातील असोत. ते व्यापारी असू शकतात, सल्लागार असू शकतात, वित्तपुरवठा करणाऱ्या उदा. बँकाही असू शकतात किंवा अन्य संस्थाही असू शकतात. याबाबतीत आपण पाहिलं आहे की- कांदे ८० पैसे किलोने विकले जातात आणि कधीकधी त्यांची किंमत ८० रु. किलो होऊन गगनाला भिडते. इतर औद्योगिक क्षेत्रात अशारीतीने १०० पट जास्त चढउतार कधीही नसतात. म्हणूनच प्रत्येकजण औद्योगिक क्षेत्राचीच निवड करू इच्छितो. कोणालाही कृषी व डेअरी व्यवसायाकडे वळण्याची इच्छा होत नाही. सद्य:स्थिती पाहिली तर शेतकऱ्यांची मुलं उच्चशिक्षण घेतात आणि शहरी भागात स्थलांतरित होतात. त्यांना नोकरी करण्यात रुची आहे पण शेती करणं आवडत नाही. ही परिस्थिती निव्वळ अशा व्यवसायांत नफा मिळत नसल्यानेच उद्‌भवत आहे. त्यांचा नफा व उत्पादन नेहमीच बाजारातील चलनवाढीवर अवलंबून आहे. तपशीलवार योजना आखून ही परिस्थिती सहजपणे नियंत्रणात आणता येऊ शकते. वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये निरनिराळ्या उत्पादनांचा साधकबाधक विचार करून गणना केली पाहिजे. सरकारी नोकरीत असलेल्या व्यक्तींकडून किंवा विविध क्षेत्रातील या विषयाशी संबंधित असलेल्या प्रामाणिक, इमानदार, जबाबदार व्यक्तींकडून ही आखणी केली जावी. जर एखाद्याने घेतलेल्या चुकीच्या निर्णयाने कृषी व दुग्धव्यवसायाचे नुकसान झाले तर त्याच्यावर कठोर कारवाई केली जावी. आपण पाहिलं आहे की दुधात भेसळ वा भ्रष्टाचार यासाठी शिक्षा मिळण्यास विलंब लागतो कारण ही दीर्घकालीन प्रक्रिया आहे आणि म्हणूनच 'न्यायाला विलंब म्हणजे न्यायाला नकार.'

मुद्दल किंवा व्याज माफ करणं अशासारखे लोकप्रिय राजकीय निर्णय हे डोळ्यात धूळ फेकण्यासारखेच आहेत. लोक कर्ज का फेडू शकत नाहीत, हे सुद्धा विचारात घेतलं पाहिजे. त्यांना कोणती अडचण आल्याने ही कोंडी झाली आहे? फक्त बाह्य उपचार करून कृषि व दुग्ध व्यवसाय वाचवता येऊ शकत नाही. अशा प्रकारे होणाऱ्या सर्पदंशावर व त्याच्या विषावर आपल्याला रामबाण उतारा माहीत असायला हवा. कारण त्यामुळेच शेतकरी हजारोंच्या संख्येत आत्महत्या करत आहेत म्हणूनच कोंडी करणाऱ्या या समस्यांचा अर्थशास्त्राच्या मदतीने नीट अभ्यास केला

जावा. काम नेमकेपणाने केले जावे. जमीन आणि पाणी यांचा वापर काळजीपूर्वक केला जावा; जर सिंचनासाठी पाणीपुरवठा करायचा असेल तर संबंधित लोकांवर योग्य तो कर आकारला जावा. या सिंचनपद्धतीत जे लोक निर्वासित झाले आहेत, त्यांना आधार दिला जावा. पिकांसाठी उपलब्ध करण्यात आलेला पाणीपुरवठा फक्त नगदी पिकांसाठी न वापरता, प्रमुख अन्नधान्ये व चारा यासाठीही त्याचा वापर व्हावा, कारण तिथे गुराढोरांचेही पालन होऊ शकेल.

लोक दुष्काळजन्य परिस्थितीमुळे स्वतःची गुरंढोरं विकून, स्थलांतर करत आहेत. सरकार अशा लोकांवर बऱ्याच मोठ्या प्रमाणात निधी खर्च करत आहे परंतु हा नुसताच बाह्यउपचार झाला, त्यामुळे प्रश्न मुळापासून सुटत नाहीत. ग्रामीण भागातील गुराढोरांना संरक्षित करण्यासाठी त्यांच्या मूलभूत गरजेच्या तुलनेत विमा हे साधन दुय्यम ठरतं. एकदा मूलभूत गरज भागली गेली की पुढील गरजांचा विचार केला जाऊ शकतो. सर्वप्रथम अन्न, वस्त्र, निवारा या गरजा भागवणं आवश्यक आहे. उपलब्ध नफ्यांतून या गरजा भागल्या पाहिजेत. पण नफा कोठे आहे? गायीच्या दुधाची किंमत सर्वसाधारणपणे २६.५० रु. लिटर आहे परंतु सरकारी दर २०.०० रु. आहे. म्हणजेच दुधाच्या उत्पादनात प्रत्येक लिटरमागे ६.५० रुपयांचं नुकसान होतं. मग तो शेतकरी कधीच विजेता होऊ शकत नाही. डेअरी व कृषी विभागातील हे अर्थशास्त्र लक्षात आल्यावर तो कधीही हा उद्योगधंदा करणार नाही; म्हणूनच या क्षेत्रात सुधारणा घडणं आवश्यक आहे. कृषी व दुग्धोत्पादन क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांची संख्या पुष्कळ आहे. ते पौष्टिक अन्नही तयार करू शकतात. ज्यामुळे कुपोषणाची समस्या सहजपणे दूर होऊ शकते.

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे सूर्य ज्याप्रमाणे सर्व दिशांना प्रकाशाने उजळवतो, त्याप्रमाणे कृषी व दुग्धोत्पादनाच्या उद्योगात दूध हा सर्व समस्यांवरील उपाय असावा. सूक्ष्म स्तरावरील योजनांच्याबाबतीत त्यांच्यावर अतिशय बारकाईने देखरेख असावी. म्हणजेच देशाची मागणी व उत्पादन यावर नियंत्रण असावं. विद्युत महामंडळाच्या तारांच्या जाळ्यांप्रमाणे राष्ट्रीय स्तरावर या उद्योगाचं जाळं असावं. जेव्हा देशाच्या एका भागात विजेची गरज जास्त असते, तेव्हा दुसऱ्या भागांमधून वीजपुरवठा त्या भागाकडे वळवला जातो. ह्याच पद्धतीने देशातील दुग्धोत्पादनाचे जाळे नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट बोर्डाची (एन.डी. डी.बी.) ची संकल्पना अतिशय पद्धतशीरपणे अंमलात आणली जावी. ह्या क्षेत्राची किंमत अशारीतीने गणली जावी की ज्यामुळे शेतकऱ्यांना

उत्पादनाच्या खर्चाव्यतिरिक्त कमीत-कमी एकूण उत्पादनाच्या किंमतीच्या २५% फायदा व्हावा. तेव्हाच हे स्थलांतरित झालेले लोक एकत्र येतील व पुन्हा एकदा हे उद्योगधंदे हाती घेतील. ते ग्रामीण भागातही त्यांच्या उपजीविकेची गरज भागवू शकतील.



लघु उद्योगधंदे अनेक क्षेत्रात नफा कमवत आहेत; जर २५% निव्वळ नफा असेल तर १० वर्षांमध्ये संपूर्ण चित्रचं पालटेल. ग्रामीण भागातील लोकसंख्या शहरी भागाकडे स्थलांतरित होण्याची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडली गेली आहे; म्हणूनच ग्रामीण भागात मनुष्यबळाची कमतरता निर्माण झाली आहे. शहरी भागात माणसांचा ओघ वाढतच आहे. जसजसे ग्रामीण भागाकडून शहरात स्थलांतर वाढेल, तसतशी घरांची गरजही वाढेल. त्यामुळे झोपडपट्ट्यांच्या संख्येतही वाढ होईल. त्याचबरोबर कायदा व सुव्यवस्था धोक्यात येण्याची समस्या निर्माण होईल. जोपर्यंत प्रत्येक विभागात अशाप्रकारे पुरेसा नफा होत नाही, तोपर्यंत हे स्थलांतर चालूच राहणार. तळापासून संपूर्ण नियोजन हा एकच उपाय आहे. त्यावर जबाबदार आणि योग्य विभागाने देखरेख करावी. याला सरकार आणि राजकारण्यांकडून अंतःकरणपूर्वक पाठिंबा दिला जावा.

लोकांसाठी उतरवलेल्या विम्याची संख्या जर लक्षात घेतली तर ती किंमत १०० कोटींपेक्षाही जास्त आहे परंतु जेव्हा आपण गुरांच्या विमा पॉलिसीचा विचार करतो, तेव्हा माणसांच्या संख्येच्या तुलनेत ५०% सुद्धा संख्या ओलांडली गेलेली नाही. वास्तविक, हा उद्योग फायदेशीर झाला, तरच लोक विम्यात गुंतवणूक करतील. हे एक प्रकारचं दुष्टचक्रचं आहे; जर फायदा नाही तर विम्याची रक्कम भरली जात नाही. त्यामुळे जोखीम जास्त आणि भविष्यकाळात नुकसान होतच राहणार, हे नक्की.

हे चित्र पालटण्यासाठी पद्धतशीरपणे प्रशिक्षण देणं गरजेचं आहे. कायदेशीर व वैधानिक अधिकार असलेल्या समितीने या कृषी व दुग्धोत्पादन क्षेत्रावर देखरेख

करावी, आणि या समितीला संवेदनशील गोष्टींबाबत प्रशिक्षण दिलं जावं. कर्ज फेडणं कठीण जात असेल तर शेतकऱ्याला नैराश्य येतं. कितीतरी कारणांसाठी जसं अन्न, वस्त्र, मुलीचं लग्न वगैरेंसाठी शेतकरी कर्ज काढतो. म्हणूनच आत्महत्येसारख्या समस्या कृषी क्षेत्रांत जास्त आढळतात. जे लोक मनाने आक्रमक असतात ते अतिरेकी किंवा नक्षलवादी कारवायांकडे वळतात. त्यामुळे बऱ्याच समस्या उद्‌भवू शकतात. आता गाईबद्दल पाहूया. गाय जेव्हा चरत असते, तेव्हा बगळा (Cattle Egrates) कीटक व गोचिडही खातो. त्यामुळे जीवशास्त्रीय दृष्टिकोनातून पर्यावरणाला घातक परजीवी किटाणूंचं उच्चाटन होतं. कोणतेही रासायनिक पदार्थ न वापरल्याने गुरांना इथे आराम मिळतो. त्यामुळे विभिन्न जातीच्या परस्परावलंबी वनस्पतींच्या सहजीवनाला चालना मिळते. विमा व पशुवैद्यकीय औषधांचं क्षेत्र आदी कृषी विभागावर अवलंबून आहे. विम्यात जोखमीचा अंतर्भाव असतो आणि औषधांमुळे गुराढोरांचं आरोग्य चांगलं राखण्यासाठी मदत होते. किती टक्के नफा मिळतो, हे या उद्योगात विचारात घेतलं जात नाही; पण कधीकधी त्यांची सेवा आणि रासायनिक द्रव्यांची परिणामकारकता याबाबत शंका निर्माण होते. हे सर्व तपासणारी, त्यावर देखरेख करणारी प्रणाली उपलब्ध नाही. यामधील आदर्श सेवाही नियमित तपासली जावी. गुन्हेगारांना योग्य ते शासन व्हावे. अशांची नावं अधूनमधून प्रसारित केली जावीत. बँकेसारख्या वित्तीय संस्थांनी ज्यांना अर्थपुरवठा केला आहे, अशा प्राण्यांचा विमा उतरवणं, हे त्या प्राण्यांच्या मालकांना ओझंचं असतं कारण अशा वित्तीय संस्थांचा उद्देश बँकाचा निधी संरक्षित करणं हा असतो. यात उत्पादकांचं कल्याण पाहिलं जात नाही. त्याचा परिणाम प्राण्यांचा दर्जा खालावण्यात होतो. वंध्यत्व असलेले, इतर काही दोष असलेले प्राणी, ब्रुसलोसिसचा संसर्ग झालेले प्राणी. गुरांच्या बाजारात असे प्राणी विकले जातात. अशारीतीने येनकेन प्रकारेण बँकांकडून कर्जाची वसुली केली जाते. पशुवैद्यकीय डॉक्टर अशांना चांगल्या आरोग्याचे प्रमाणपत्र देऊन मोकळा होतो त्यासाठी त्याला त्याचा हिस्सा मिळालेला असतो. विमा कंपन्यांना त्यांचा हप्ता मिळतो. शेतकरी मात्र आहे तिथेच राहतो. तो कर्जबाजारी होतो, त्याच्या खिशात एकही दमडी राहात नाही. ज्याची कधीही कल्पना केलेली नाही, असं हे चित्रं. हे सर्व टाळण्यासाठी ग्रामीण उपजीविकेत परिवर्तन होऊ शकतं. जर सरकार, राजकारणी, सरकारी अधिकारी यांनी लक्ष घालून मोठ्या प्रमाणात विस्तारीत कामासाठी कार्यक्रम आयोजित केले तर! यासाठी समर्पित कामगार व एन.जी.ओं. ना मदतीला घ्यावं, हे

फक्त दूध किंवा गुराढोरांसाठी नसून कृषीक्षेत्रातील प्रत्येक उपयुक्त वस्तू व मालासाठी लागू आहे.

दुग्धोत्पादन विभागातील मूळापासूनच्या समस्यांचं निराकरण करण्यासाठी त्यातील तफावत भरून काढणं गरजेचे आहे. यासाठी खालीलप्रमाणे एक अधिक चांगली प्रतिकृती सुचवली जाऊ शकते :

१) कृषी - दुग्धोत्पादन क्षेत्राची अधिक चांगली काळजी घेण्यासाठी एकच संस्था अथवा समिती स्थापन केली जावी. त्यांनी एकाच छताखाली काम करावे.

२) या क्षेत्रातील उत्पादकांनी ठरवलेल्या खरेदी किंवा विक्रीच्या किंमती वाजवी असाव्यात. उत्पादक व ग्राहकांची पिळवणूक थांबावी.

३) जेव्हा किंमती आवाक्यात येतील, तेव्हा या उद्योगधंद्यातील जनजागृती वाढेल. 'नफा होणार आणि मी हे करू शकतो.' असा आत्मविश्वास त्यांच्यात निर्माण होईल.

४) या क्षेत्रामध्ये छोट्या प्रमाणात प्रशिक्षणाचे कार्यक्रम घेतले जावेत. ज्यात सकारात्मक व नकारात्मक मुद्द्यांबाबत स्पष्टीकरण दिलं जाईल. या प्रशिक्षणात वेगवेगळ्या सरकारी योजना, आर्थिक धोरणं आणि बाजारातील स्थितीचा अंतर्भाव केला जावा. सद्य:स्थितीत अनुभवी व सुशिक्षित व्यक्तींचा नोकरीतील स्तर हा १०% पेक्षाही कमी आहे. म्हणूनच पर्यवेक्षकांनाही प्रशिक्षण दिले जावे व त्यांच्यावर देखरेख ठेवावी.

५) शेतकऱ्यांना देण्यात येणारे निधीसुद्धा कधीही गैरवापर करता येणार नाहीत, असे असावेत. ज्याप्रमाणे संपूर्ण जेवणात सर्व अन्नघटकांचा समावेश असतो, त्याप्रमाणे शेतकऱ्यांना व्यवस्थित माहिती दिली जावी. खात्रीचा कच्चा माल कुठे मिळेल आणि बाजारात कशारीतीने तो माल विकायचा याविषयी सांगितलं जावं. दुग्धोत्पादनाच्या औद्योगिक क्षेत्राकडून हा निधी उत्पन्न केला जावा. उदा. १ लिटरमागे एक रुपया याचप्रमाणे दूध व उपउत्पादनं बाजारात विकणाऱ्यांकडून निधी गोळा केला जावा. इतर दुग्धोत्पादनाच्या किमतीनुसार

लागणाऱ्या दुधाचं मोजमाप आधीच केलं जावं. म्हणजे ग्राहकांकडूनही त्याची वसुली करता येईल.

प्रतिलिटरमागे २ रु. याव्यतिरिक्त ग्रामीण क्षेत्रातील विकासासाठी आणि लोकांच्या उपजीविकेसाठी सरकारकडूनही सहकार्य व आर्थिक मदत केली जावी. आमदार व खासदार निधीतून, इतर निरनिराळ्या योजनांमधून हे साध्य होऊ शकेल. दुग्धोत्पादकांनीही या निधीसाठी प्रत्येक लिटरमागे ५० पैसे असा हातभार लावावा. या उपलब्ध पैशांमधून शेतकऱ्यांच्या जीवनातील प्रत्येक गरज उदा.- लसीकरण, कर्जावरील व्याज, अन्न, वस्त्रं, शेती, मुलांची लग्न, शिक्षण, उपचार इ. भागवली जावी. यासाठी विनामूल्य किंवा किरकोळ खर्च घेतला जावा. विविध स्तरांवरील पुढील समित्यांमार्फत बारकाईने देखरेख करण्यात यावी.

- राष्ट्रीय पशुपालन कल्याण समिती
- प्रांतीय पशुपालन कल्याण समिती
- जिल्हा पशुपालन कल्याण समिती
- तालुका/गट पशुपालन कल्याण समिती

उपलब्ध निधीचे विभाजन खालीलप्रमाणे व्हावे-

रु. ०.२०- विमा व ओळख पटवण्यासाठीचा पुरावा. रेडिओ फ्रिक्वेन्सी आयडेंटीफिकेशन डिव्हाइससारख्या(आर.एफ.आय.डी.) योजना अंमलात आणल्या गेल्या पाहिजेत. आधारकार्डासारखं हे वैधानिक असावं. (प्रत्येक प्राण्याच्या जन्मापासून ते त्याची कत्तल केली जाईपर्यंत देखरेखीसाठी ह्याचा उपयोग व्हावा.)

रु. ०.२०- ग्रामीण क्षेत्रातील कुठल्याही भागात औषधं व पशुवैद्यांकडून उपचार विनामूल्य व सतत २४ तास सेवा उपलब्ध असावी.

रु. ०.२०- सिद्ध वळूंचा मादींसाठी कृत्रिम रेतनाकरीता वीर्य प्रयोगशाळा विकसित केल्या जाव्यात. नोंदी ठेवणे आणि देखरेख करणे हे नियमितरीत्या अमलात आणलं जावं.

रु. ०.२०- विक्रीचं तंत्र व जाहिरातींसाठी रेडिओ व टी.व्ही.चा समावेश केला जावा. उत्पादक व ग्राहक यांच्या प्रशिक्षणावर भर दिला जावा. यासाठी एकच ब्रॅण्ड हा हेतू असावा.

रु.०.२०- स्थानिक गुराढोरांच्या प्रजाती विकासावर भर देणं.

रु. ०.२०- कृषी/पशुवैद्यकीय विदयापीठ व कॉलेजमध्ये संशोधन व विकास यांना उत्तेजन देणं. त्यावर प्रयोग करणं आणि उत्पादकांना हे संशोधन कसं फायदेशीर ठरेल, हे पाहणं तसंच उपउत्पादनांचा विकास कशाप्रकारे होईल, हे जाणून घेणं.

रु. ०.२०- गुरांची विक्री व सेवा. गुरांच्या विक्रीसाठी बाजार भरवणे. यात उत्तम दर्जाचं व खात्रीचं पशुधन उपलब्ध केलं जावं. त्याचवेळी जर एखाद्याला या उद्योगात अपयश आले तर त्याच्याजवळील पशुधन तत्काळ परत घेतलं जावं तसेच ज्या प्राण्यांना समस्या असतील उदा. वंध्यत्व आलेल्या प्राण्यांसाठी तज्ज्ञ पर्यवेक्षकांकडून ते पुन्हा प्रजाती कसे उत्पन्न करू शकतील, हे पाहणं. त्यांच्या मालकांकडून यासाठी योग्य ती किंमत आकारली जावी. प्रत्येक तालुका/ गट स्तरावर अशा गुरांच्या उपचारांसाठी खास जागा विकसित केली जावी. लसीकरण, निर्जंतुकीकरण, रोगप्रतिबंधक उपचारही व्हावेत.

रु. ०.२०-लसीकरण, जंत व गोचिड निमूर्लन.

रु. ०.२०- प्रशिक्षण, समन्वय व देखरेख.

रु. ०.२०- नर व मादी वासरांचे संगोपन करण्यासाठी प्रत्येक तालुका/ गट स्तरावर गुरं संगोपन केंद्र.

रु. ०.२०- बायोगॅस व खतांसाठी यंत्रसंच.

रु. ०.२०- वैरण याकरता बी-बियाणे, गुराढोरांसाठी अन्नाचा पुरवठा करण्यासाठी, युरिया प्रक्रियायुक्त वगैरे.

रु. ०.१०- आणीबाणीसाठी उपलब्ध निधी व शिल्लक रकमेतून नोंद केलेला निधी किंवा भविष्यकालीन तरतूद.

एकूण रु. २.५०

ही पद्धत इतर पशूंसाठीही लागू केली जाऊ शकते. उदा.- अंडी २५ पैसे प्रतिनग.

चिकन/कोंबडी- रु. १.२५ प्रति किलो.

मटण- रु. ३० प्रति किलो.

म्हणजेच अंदाजे १०% ही शेवटची किरकोळ विक्रीची जास्तीतजास्त किंमत.

देखरेख करण्याच्या पद्धती. हेतू-सर्वांसाठी काम तालुकास्तरावर. सर्वांसाठी आरोग्य हीच खरी संपत्ती.

पंचायत समिती (पी.एस.)- सहकारी क्षेत्र- खाजगी क्षेत्र - इतर खाजगी कंपन्या - माध्यमं - एन.जी. ओ.- दुग्धविकास विभाग - पशुसंवर्धन विभाग

जिल्हा स्तर- जिल्हा सहकारी दूध संघटना, जिल्हा परिषद इ.

राज्य स्तर - दूध महासंघ, महाराष्ट्र पशुधन विकास बोर्ड, बी.ए.आय.एफ इ.

राष्ट्रीय स्तर- एन.डी.डी.बी.- राष्ट्रीय डेरी विकास बोर्ड, नाबार्ड, एन. सी. डी. एफ.आय. (भारतीय राष्ट्रीय सहकारी दूध महासंघ), एन.सी.डी.सी. इ.

आपण सर्वांनी एकत्रित होण्याची गरज का आहे?

१) किंमतीमध्ये स्थैर्य आणणे त्यासाठी स्पर्धा टाळणे (एकच किंमत)

२) रोगराई टाळण्यासाठी सर्व गुरांचे लसीकरण

३) चांगल्या प्रजोत्पादनासाठी वापरलेले, उत्तम जननशास्त्रीय साहित्य सरतेशेवटी सर्वांना चांगला परिणाम देईल.

४) विक्रीसाठी एकच ब्रॅण्ड उदा. आंतरराष्ट्रीय स्तरावर 'अमूल', राष्ट्रीय स्तरावर 'मदर डेअरी', राज्य स्तरावर 'महानंदा,' किंवा जी. सी. एम. एम. एफ. गुजरातप्रमाणे किंवा महाराष्ट्र मिल्क मार्केटिंग बोर्ड (एम. एम. एम. बी.), त्यामध्ये सहकारी, खाजगी व सरकारी क्षेत्राचा अंतर्भाव राहील.

५) किमती आटोक्यात आणण्यासाठी, कामाची पुनरावृत्ती टाळण्यासाठी.

६) शेतकऱ्यांना त्यांच्या प्रत्येक समस्या सोडवण्याकरता एक खिडकी सेवा (वन विंडो) उपलब्ध करणे.

७) एकच संशोधन करणारी संस्था सर्व विभागांना व उद्योगांना मार्गदर्शन करेल. उदा. वसंतदादा सहकारी साखर संस्था उसाची शेती करणाऱ्यांसाठी मार्गदर्शन करते.

## ग्रामीण भागातील समस्यांमध्ये घट होण्यासाठी

- **विमा-सेवा**

१) शेतकरी नवरा आणि बायको

२) जनावरे

३) गोठा

४) इतर साहित्य उदा.दूध काढण्याचे यंत्र

५) उत्पादन क्षमतेवर परिणाम करणाऱ्या रोगांपासून संरक्षण; उदा. संसर्गजन्य गर्भपात (ब्रुसेलोसिस) यात ५५% जनावरे काही ठिकाणी बाधित आहेत.

६) या सेवा सुटसुटीत व सक्तीच्या असाव्यात तसेच पशुपालन कल्याण समितीमार्फत मोफत असाव्यात.

● **विश्वासपूर्ण हमी सेवा**

१) पशुपालन मार्गदर्शन.

२) कृषी सेवा.

३) पशुसंवर्धन सेवा.

४) दूध उत्पादनाबरोबर दुग्धजन्य पदार्थ कसे करावेत याचे मार्गदर्शन.

५) विपणन सेवा.

६) विस्तार सेवा.

या कृषी दुग्धोत्पादन उद्योगात अगदी जवळून देखरेख करणं गरजेचं आहे. कारण लहानसहान अनुभवही गोळा केले जावेत आणि ही माहिती सर्वांमध्ये प्रसारित केली जावी. त्याचे होणारे परिणाम शोधून काढावेत. या परिणामांवर डोक्याला खाद्य देणारी वादळी सत्रं पुन्हा पुन्हा भरवली जावीत, ज्यामुळे पुढील निर्णय घेणं शक्य होईल. हे निर्णय नंतर अमलात आणले जावेत व निरीक्षणाद्वारे गोळा केलेली योग्य माहिती व तज्ज्ञांची मते यावर अंमलबजावणी असावी. ही प्रणाली उत्तम व सुनियोजित करण्यासाठी वरील चक्रं ठेवावे लागेल.

प्रजोत्पादनाचं धोरण नुसतंच कागदावर असून दुर्दैवाने त्याची अंमलबजावणी झालेली नाही. या कामातील कामगारांवर अंकुश नाही. हे काम ते शास्त्रीय दृष्टिकोनातून करतात का? व त्यांचं काम कोणत्या दर्जाचं आहे आणि वीर्य अथवा शुक्राणू वापरण्यात आलेलं प्रमाण योग्य आहे का ? ही प्रश्नचिन्हचं आहेत. म्हणजेच प्राण्यांच्या रक्तांच्या स्तराचे सुनियोजन झालेले नाही. प्रत्येक प्राण्यांच्या प्रजोत्पदनाच्या

दुग्धोत्पादनात वाढ झालेली नाही. शेतकऱ्यांनासुद्धा योग्य ते शिक्षण दिलं गेलेलं नाही. कृत्रिमरेतनाचे सर्वेक्षण १००% जरी विचारात घेतले, तरी शेतकऱ्यांना वळूच्या इतिहासाची माहिती नाही. इथे कृत्रिमरेतन क्षेत्रातील सेवकांनी नोंद केली पाहिजे. त्यांनी जबाबदारीने सेवा द्यावी यासाठी त्यांना प्रशिक्षण दिलं पाहिजे. ज्यामध्ये त्यांची विश्वासार्हता दिसून यावी. कमी दर्जाच्या शुक्रबीजांवर बंदी आणली जावी. सिद्ध झालेल्या वळूचं वीर्य वापरलं जावं. गाई व म्हशी पाळल्यामुळे आपल्याला पुष्कळ गोष्टी मिळतात उदा. दूध, मांस, जनावरांचे कातडे, कृषि कचऱ्याचं रूपातंरण बैलशक्ती उर्जेचा विकास, खतं, शिंगं व हाडांपासून बनवलेली शस्त्रं, शोभिवंत वस्तू वगैरे. अशारीतीने मालाची अदलाबदल करून व्यापार करणं, पैशांची देवाणघेवाण करून व्यापार किंवा कर्जासाठी तारण इ. मुळे आर्थिक विकासाला मदत होते.

दुग्धोत्पादनातील महत्त्वाचे फायदे पुढीलप्रमाणे आहेत-

१) दूध- दूध हे उच्च दर्जाचे पौष्टिक अन्न आहे. दूध उत्पादन करताना स्वच्छतेकडे लक्ष दिल्यास उच्च प्रतीचे दूध बाजारात उपलब्ध होऊ शकेल.

२) कालवड (मादी वासरू) - त्यांच्या संगोपनाचा कार्यक्रम प्रामाणिकपणे हाती घ्यावा. म्हणजे उत्तम प्रतीच्या कालवडी होतील. नंतर गाई सहजपणे व स्वस्तात शेतकऱ्यांना घरपोच मिळू शकतील. परंतु दुर्लक्ष झाल्यामुळे, सहनशीलता अथवा चिकाटीचा अभाव असल्याने, शास्त्रीयदृष्ट्या संगोपन न केल्यामुळे त्यांची मृत्यूची संख्या जास्त आहे. दुभती गाय खरेदी करणे, ही एक वाईट प्रवृत्ती आहेच. परंतु, खर्चाच्या व किंमतीच्या दृष्टीने हे परिणामकारक होत नाही.

३) नर वासरे - पुष्कळशा विभागात नरवासरांच्या मृत्यूच्या संख्येचा दर १००% आहे. उपासमारीने नर वासरांचा मृत्यू ओढवतो. म्हणजे छोट्या वासरांना पुरेसं दूध दिलं जात नाही. हे चित्रं सहज पालटलं जाऊ शकतं. अशा वासरांचं एकत्रित पालनपोषण करण्यासाठी खास गोशाळांची व्यवस्था असावी. दूरच्या प्रदेशांसाठी, नैसर्गिक रेतनसेवेसाठी अशी वासरे मिळावीत. उदा. विशिष्ट कामासाठी किंवा गोमांसासाठी यांचा उपयोग व्हावा. यामुळे दुग्धोत्पादन व्यवसायाच्या उत्पन्नाच्या स्रोतांमध्ये आणखी वाढ होऊ शकेल.

४) शेण - गोबर गॅस यंत्रसंच (प्लान्ट) उभारल्यामुळे अर्थशास्त्रीय दृष्टीने उर्जेचा स्रोत मिळतो. अशारीतीने हा संच व्यक्तींद्वारे अथवा एकत्रितपणे समाजाकडून

उभारला जाऊ शकतो. म्हणजे चांगलं शेणखत तर मिळेलच पण स्वच्छताही राखली जाईल. चांगल्या आरोग्यासाठी हे उपयुक्त आहे. अशारीतीने शक्तीचं, उर्जेचं जतन, पर्यावरणाचं संरक्षण, वृक्षसंगोपनाला उत्तेजन दिल्यामुळे ग्रामीण भागात अधिक बचतही होईल.

याव्यतिरिक्त गुराढोरांचं पालनपोषण करून त्यांना वाढवताना, त्यांच्याकडून माणसांना खूप प्रेम मिळतं. ज्याची गणना पैशांमध्ये केली जाऊ शकत नाही. आध्यात्मिकदृष्ट्याही जीवन-मरणाचं चक्र उमजतं. तरुणांना लैंगिक शिक्षणही आपोआपच मिळतं.

हजारो उपउत्पादनांमध्ये दुधाचं रूपांतर होऊ शकतं. जसे -दही, लोणी, चीज, आईसक्रीम इ. हे अतिशय पौष्टिक पदार्थ आहेत. भारतामध्ये दुधाची अंदाजे दरडोई उपलब्धता २५० मि.ग्रॅ. प्रतिदिन आहे. परंतु इस्रायल, अमेरिका यासारख्या विकसित देशात हीच दरडोई उपलब्धता १ लिटरपेक्षाही जास्त आहे. त्यामुळे भारताला या व्यवसायात चौपट पटीने संधी उपलब्ध होऊ शकते. पशुवैद्यकीय औषधं, रासायनिक द्रव्यं व साधनं या प्रकारच्या जोडव्यवसायाचाही यात समावेश आहे. म्हणूनच दुग्धोत्पादन व्यवसायाचं संरक्षण करताना त्याला कृषी क्षेत्राशी जोडणं आवश्यक आहे. हे एखाद्या वडाच्या झाडाच्या मोठ्या देठाचं किंवा खोडाचं रक्षण केल्यासारखं आहे. जर देठ किंवा खोड मजबूत असेल तर सर्व साधनं नैसर्गिकरीत्या मुळापासून उपयोगात आणली जाऊ शकतील. त्यांच्या अनेक शाखा निर्माण होऊन फळं मिळतील व दूध डेअरींचं रक्षण होईल. यासाठी ध्येयवादी व समर्पित मनुष्यबळाची गरज आहे. हे मनुष्यबळ सरकारी, खासगी, सहकारी क्षेत्रातून व एन.जी.ओ. तून मिळू शकेल.

वाहन उद्योगधंद्यात ज्याप्रमाणे शोरूम असतात, जिथे चाचणी, विक्री व विक्री पश्चात सेवा मिळतात त्याच पद्धतीने गाई व म्हशींची खरेदी-विक्री करण्यासाठी खात्रीशीर बाजार असावा. शेतकऱ्याला त्याची गुरे बदलावीत असे जेव्हा वाटेल किंवा विकायची असतील तेव्हा त्याची पिळवणूक होऊ नये. पशुवैद्यकीय क्षेत्रात विनम्र, शैक्षणिक माहिती पुरवणारे, २४ तास फिरती सेवा देणारे पशुवैद्यक दुग्धोत्पादकांसाठी उपलब्ध असावेत. जनावरांचं अन्न, चारा, वैरण यासाठी चांगल्या प्रकारची बी-बियाणं मिळाली पाहिजेत. ज्यामुळे जनावरांसाठी कमी दर्जाचं जाडंभरडं अन्न मिळणं ही समस्या टाळता येईल. चांगल्या प्रकारच्या वैरणीत, निरुपयोगी गोष्टींमधून मिथेन वायू जो पर्यावरणाला मारक आहे, तो निर्माण होण्याचं प्रमाण

नगण्य असेल. गुराढोरांचा दर्जा व दर ठरवताना दृष्टिकोन सकारात्मक व सहकार्य करणारा असावा. त्यामुळे त्याबाबतीत जोखमीस कारणीभूत परिस्थिती टाळता येईल आणि अर्थातच ग्रामीण भागातील उपजीविकेची साधने सुरक्षित होतील.

याकरिता कायदा व वैधानिक विभागाच्या नियंत्रणाद्वारे त्यात हस्तक्षेप करणं गरजेचं आहे. योग्य ते कायदे, विस्तारीत क्षेत्र, प्रशिक्षण यांद्वारे चांगलं मनुष्यबळ तयार केलं जावं. सद्य:स्थिती बदलण्यासाठी व हे चित्र पालटण्यासाठी आपण प्रायोगिक तत्त्वावर पथदर्शक व मार्गदर्शक उपक्रम हाती घेऊ शकतो. ज्यासाठी राज्यातील लहानात लहान विभाग, जिल्हा घेऊन हा उपक्रम राबवला जाऊ शकतो. यामुळे तोट्यात चालणाऱ्या या दुग्धोत्पादन व्यवसायाचा भविष्यकाळ उज्ज्वल राहील.